MHLA160003782018

**<u>नियमित फौजदारी खटला क्र.५१/२०१८</u>**
**<u>शासन वि. संदिपान व ईतर</u>**

–:: **<u>नि.क्र.१ लगत आदेश</u>** ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. पोलीस ठाणे अधिकारी पोलीस ठाणे देवणी यांनी दि.३०/०७/२०१८ रोजी भारतीय दंड विधानाचे कलम ४४७, २९४, ३२३, ५०६ सह कलम ३४ च्या गुन्ह्याकरिता आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले आहे. त्यानंतर तत्कालीन न्यायदंडाधिकारी यांनी दि.१३/०८/२०२५ रोजी दोषारोप (नि.२४) निश्चित केला. अभियोग पक्षाने चार साक्षीदारांची साक्ष नोंदविली, परंतु ईतर साक्षीदारांना हजर केलेले नाही आणि त्यांची साक्ष नोंदविण्यास कसूर केला. प्रकरण फार जुने आहे. सन्माननीय उच्च न्यायालयाने जुनी प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत आदेशित केलेले आहे. सबब आरोपींना जलद गतीने प्रकरण चालविण्याचा आणि निकाली काढण्याबाबतचा अधिकार आहे. अभियोग पक्षाच्या कृतीमुळे आरोपींच्या मौलिक अधिकाराचे हनन होत आहे. सबब सदर प्रकरणाची स्थिती बघता अभियोग पक्षाचा पुरावा बंद करणे उचित ठरेल. यथास्थितीत अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात येतो आणि प्रकरण पुढे चालविण्यात येते.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.07.22 13:47:50 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – २२–०७–२०२६**

**( शरद अ. सुरजुसे )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**देवणी.**